MHWS090001272020

दाखल दिनांक : १३/०२/२०२०
नोंदणी दिनांक : १३/०२/२०२०
निकाल दिनांक : १६/०३/२०२६
कालावधी : **०६** व, **०१** म, **०३** दि

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२), मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित दिवाणी दावा क्र. ०८/२०२२** **निशाणी क्र.– ३८**

**नारायण राघोजी अढाउ**
वयः ७४ वर्ष धंदाः शेती
रा. हातोली, ता.मानोरा, जि.वाशिम ... **वादी**

विरुद्ध

१. **देविदास नारायण ठाकरे**
वय अंः ४५ वर्ष, धंदाःशेती

२. **बन्सीराम मारोती सोनोने**
वय अंः ६० वर्ष, धंदाःशेती

३. **ज्ञानेश्वर लोभा राठोड**
वय अंः ३५ वर्ष, धंदाःमजुरी
सर्व रा. हातोली, ता. मानोरा,
जि.वाशिम. ... **प्रतिवादी**

**दावा : कायमस्वरुपी मनाई हुकुम मिळणेबाबत** ...........

---

वादीतर्फे विद्वान विधिज्ञः श्री. एस. एन. पखाले
प्रतिवादीं क्र.१ तर्फे विद्वान विधिज्ञः श्री. पी. डी. राठोड
प्रतिवादीं क्र.३ तर्फे विद्वान विधिज्ञः श्री. टी. ए. खान पटेल
प्रतिवादीं क्र.२ विरुद्धः एकतर्फी

---

## न्यायनिर्णय

(दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी घोषित)

प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुद्ध कायम मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्र.क्र.१ कडे गट नं.१३०/१ मध्ये १ हे. २५ आर शेतजमीन आहे. सदर शेतजमीनीची चतुःर्सिमा पुर्वेस – सरकारी जमीन, पशिमेस– सी क्लास जमीन, उत्तरेस–पंडीत कदम यांचे शेत व दक्षिणेस आनंदा शामराव यांचे शेत आहे. (सदर मालमत्तेस यापुढे ''**वाद मिळकत**'' असे संबोधण्यात येईल)

२. वादीचे संक्षिप्त कथन असे की, तो ग्राम हातोली, ता. मानोरा, जि. वाशिम येथील आदिवासी व निरक्षर रहिवासी आहे. त्याने प्र.क्र.२ कडून सर्वे नं. १३०/१ मधील ०२ हे.०.४६ आर जमीन रु.१,७०,८००/– मध्ये खरेदी करण्याचे ठरवून दि.०४/०२/२००२ रोजी इसार म्हणून रु.५५,०००/– देऊन सौदेचिठ्ठी केली व उर्वरित रक्कम दि.०१/०५/२००२ रोजी देण्याचे ठरले. मात्र मुलगा अशोक अढाउ याच्या ऑपरेशनमुळे पैसे खर्च झाल्याने रु.३०,०००/– कमी पडले. म्हणून वादीने प्र.क्र.१ कडून सावकारीने रक्कम घेतली व त्यांच्या अटीप्रमाणे जमीन त्यांच्या नावाने खरेदी करून घेतली. पुढे दि.२९/१२/२०१० रोजी वादीने रक्कम रु.३०,०००/– परत केल्यानंतर, प्र.क्र.१ ने १ हेक्टर २१ आर. शेतजमीनीची खरेदी वादीच्या नावाने केली व उर्वरीत जमीनीची खरेदी वादीचा मुलगा नामे रमेश अढाउ यांच्या नावे करुन देण्याचे सांगितले. काही जमीन त्याच्या नावाने झाली तर उर्वरित मुलगा रमेश अढाउ यांच्या नावाने करण्याचे आश्वासन असूनही ती झाली नाही. प्र.क्र.१ कडे विचारणा केली असता उडवा उडवीची उत्तरे देत धमक्या देतो. वादी व प्र.क्र.१ मध्ये जेंव्हा सदरचा व्यवहार झाला त्यावेळी साक्षदार म्हणून संजीत निळकंट चौधरी, गोविंदराव चेंडुजी आढुळे व प्रकाश ठाकरे सर्व. रा. हातोली हे तेथे हजर होते. तसेच गट नं.१३०/१ मधील उर्वरित १ हे.२५ आर वादमिळकत प्र.क्र.१ हा प्र.क्र.३ ला विकण्याचा प्रयत्न करीत असल्याने, सावकारी व्यवहारानुसार जमीन परत मिळण्याचा हक्क असूनही ती इतरास विकू नये म्हणून वादी तयार असून, नोटीस देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने

प्रतिवादींनी वादमालमत्तेत हस्तक्षेप करू नये असा कायम मनाई हुकूम मिळविण्यासाठी हा दावा दाखल केला आहे.

३. प्र.क्र.३ यांनी नि.क्र.१६ वर त्यांचे म्हणणे दाखल करून प्र.क्र.१ कडे गट क्र.१३०/१ मधील १.२५ हे. आर जमीन असून ती विकण्याची तयारी असल्याचे मान्य केले. मात्र वादीचे इतर सर्व म्हणणे नाकारले. वादातील जमीन मूळतः प्र.क्र.२ यांच्या मालकीची असून त्यांनी दि.३०/०१/२००४ रोजी खरेदीखत क्र.११६ द्वारे ती प्र.क्र.१ यांना विकून ताबा दिला. त्यानुसार फेरफार क्र.४५५ दि.१२/०२/२००४ रोजी नोंदविण्यात आला. ज्यावर वादीने कधीही आक्षेप घेतला नाही. पुढे प्र.क्र.१ यांनी दि.२९/१२/२०१० रोजी १ हे.२१ आर जमीन वादीला विकून उर्वरित १.२५ हे.आर स्वतःकडे ठेवली. आर्थिक गरजेमुळे प्र.क्र.१ यांनी उर्वरित जमीन प्र.क्र.३ व त्याचा भाऊ धनराज राठोड यांना ६,७०,०००/– मध्ये विकण्याचा सौदा करून इसारपट दि.०४/०२/२०२० रोजी दस्त क्र.१९१/२०२० नोंदवून ताबा दिला व शेती केली. ही बाब वादीला माहिती असूनही त्याने आवश्यक पक्षकारांचा समावेश केला नाही व इसारपटाला आव्हान दिले नाही. सौदा रद्द करण्यास नकार दिल्याने वादीने खोटा दावा दाखल केला. वादीने पूर्वी कोणताही वैध सौदा केलेला नसून दावा मुदतबाह्य व कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य नाही. तसेच कायम मनाई हुकूम मागण्याचा अधिकारही नाही. त्यामुळे वादीचा दावा खर्चासह फेटाळावा व प्र.क्र.३ यांना रु.१०,०००/– नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी केली.

४. प्रतिवादी क्र.२ यांना दाव्याच्या नोटीस मिळूनही ते प्रकरणात हजर झाले नसल्याने माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी दावा प्रतिवादींविरुद्ध एकतर्फी चालविण्याचा आदेश दि.२७/०८/२०२० रोजी पारीत करण्यात आला. प्र.क्र.२ प्रकरणात हजर होवूनही त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. तसेच नि.क्र.१ खालील दि.२१/०७/२०२३ रोजीच्या आदेशाप्रमाणे दावा प्र.क्र.१ चे विरुद्ध अबेट करण्यात आला.

५. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. एन. पखाले यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींतर्फे युक्तीवाद करण्यात आला नाही. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले. त्याउपरांत

खालील मुद्दे माझ्या अवलोकनार्थ उपस्थित होतात. त्यानुसार मी माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे सिद्ध करतो काय की, प्र.क्र.१ कडून त्याने सावकारी तत्वावर घेतलेल्या ३०,०००/– रुपयांच्या मोबदल्यात वाद जमीन प्र.क्र.१ ला नाममात्र खरेदी करुन दिली होती ? | **...नाही** |
| २. | वादी सिद्ध करतो काय की, सावकारी रक्कम प्र.क्र.१ ला व्याजासह परत केल्यानंतर वाद जमीन वादीला परत करण्याचे प्र.क्र.१ चे पंचांसमक्ष कबुल केले होते ? | **...नाही** |
| ३. | वादी सिद्ध करतो काय की, तो आजच्या भावाने प्र.क्र.१ कडून वाद जमीन खरेदी करुन घेण्यास तयार आहे मात्र प्र.क्र.१ तयार नाही ? | **...नाही** |
| ४. | वादी सिद्ध करतो काय की, वाद शेतजमीन प्र.क्र.१ ने प्र.क्र.३ ला विकल्यास वादीचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होणार आहे ? | **...नाही** |
| ५. | प्र.क्र.१ ने प्र.क्र.३ ला वाद शेतजमीनीची विक्री करु नये असा मनाई हुकुम प्रतिवादी विरुद्ध मिळण्यास वादी पात्र आहे का ? | **...नाही** |
| ६. | आदेश व हुकुमनामा काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ५ बाबत**

**६.** सदर मुद्दे एकमेकांशी संबंधित असल्यामुळे तसेच पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रितपणे चर्चिले आहेत. वादीने आपले म्हणणे सिद्ध करणेहेतु त्याचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.२९ वर दाव्यातील बहुतांश मजकुरांची पुनरावृत्ती केलेली आहे. तसेच वादीने त्याचे समर्थनार्थ दस्त नि.क्र.३३ वर मुळ खरेदीखत व जमीन विक्रीची सौदेचिठ्ठीची नि.क्र.३४ वर दाखल केली आहे. प्रतिवादीतर्फे त्याचा उलटतपास घेण्यात आलेला नाही. प्रतिवादींतर्फे तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. वादीने असा दावा केला की,

प्र.क्र.१ यांनी सावकारी व्यवहारातून कथित जमीन स्वतःच्या नावाने घेतली. नि.क्र.३३ वरील खरेदीखताप्रमाणे वादीने प्र.क्र.१ कडून गट क्र.१३०/१ मधील संपूर्ण क्षेत्र २ हे. ४६ आर पैकी १ हे. २१ आर फक्त दि.२९/१२/२०१० रोजीचे खरेदीखत क्र.१३१२ प्रमाणे खरेदी केल्याचे दिसून येते. परंतु, त्यासंदर्भात नि.क्र.३३ वरील सौदेचिठ्ठी व नि.क्र.३४ वरील खरेदीखत वगळता इतर कोणताही पुरक कागदोपत्री पुरावा व विश्वसनीय दस्तऐवज किंवा स्वतंत्र साक्षीदार तपासले नाही. भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ च्या कलम १०१ व १०२ नुसार, ज्यावर दावा आहे त्यानेच तो सिद्ध करणे आवश्यक असते. वादीचे म्हणणेप्रमाणे त्याने प्र.क्र.१ कडून सावकारी तत्वावर घेतलेल्या रुपयांच्या मोबदल्यात वादजमीन प्र.क्र.१ ला नाममात्र खरेदी करुन दिल्याची बाब सिद्ध झालेली नाही. तसेच कथित सावकारी रक्कम प्र.क्र.१ ला व्याजासह परत केल्यानंतर वादजमीन वादीला परत करण्याचे प्र.क्र.१ ने पंचांसमक्ष कबुल केल्याची, तसेच वादी आजच्या बाजार किमतीप्रमाणे प्र.क्र.१ कडून वादजमीन खरेदीकरण्यास तयार असल्याची बाबही पुरक तोंडी व कागदोपत्री पुराव्या अभावी सिद्ध झालेली नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

७. वादीचे असे म्हणणे आहे की, वाद मालमत्ता प्र.क्र.१ ने प्र.क्र.३ ला विकल्यास त्याचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादीने अभिलेखावर दाखल केलेले दस्त व म्हणण्याप्रमाणे नोंदणीकृत खरेदीखत दि.३०/०१/२००४ नुसार प्र.क्र.१ हे वादमिळकतीचे कायदेशीर मालक ठरतात. नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम १७ व मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८२ चे कलम ५४ नुसार नोंदणीकृत खरेदीखत हे मालकी हक्काचे निर्णायक पुरावा आहे. वादीने या खरेदीखतास आजपर्यत आव्हाहन दिल्याचे अभिलेखावर दिसत नाही. तसेच प्र.क्र.१ कथित जमीनीचा मालक असल्याने त्याला त्याची शेतजमीन त्याच्या मर्जीने विल्हेवाट लावण्याचा कायदेशिर अधिकार आहे. म्हणून त्याच्या अशा अधिकारावर निर्बंध आणणे योग्य होणार नाही. अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरुन वादीचे कथन विश्वसनिय वाटत नाही.

८. विशिष्ट दिलासा अधिनियम, १९६३ चे कलम ३८ नुसार कायम मनाई हुकुम देण्यासाठी वादीचा विद्यमान कायदेशीर हक्क व त्यावर धोका सिद्ध होणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात वादीकडे वादमिळकतीवर कोणताही विद्यमान हक्क सिद्ध झालेला नाही. वादीने असा कोणताही ठोस तोंडी व कागदोपत्री विश्वसनिय पुरावा दिलेला नाही की, प्रतिवादींनी जमीन विकल्यास त्याला अपूरणीय नुकसान होईल. त्यामुळे वादीने प्रार्थना केलेप्रमाणे त्यास कायम मनाई हुकुम देण्याचे कारण घडत नाही. प्रस्तुत प्रकरणात वादीचा वादमिळकतीवर कोणताही कायदेशीर हक्क सिद्ध होत नाही. वादीने असा कोणताही ठोस पुरावा दिलेला नाही की, वादमिळकतीची विक्री झाल्यास त्यास अपूरणीय नुकसान होईल. त्यामुळे मनाई हुकूम देण्याची आवश्यकता दिसून येत नाही. त्यामुळे वरील परिस्थीती व तथ्यांचा विचार करुन वादी मागणी केलेप्रमाणे कायम मनाई हुकूम मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे मुद्दा क्र.४ व ५ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.६ बाबत</u>**

**९.** वरील सर्व कारणांवरून स्पष्ट होते की, वादीने आपले दावे कोणत्याही ठोस व विश्वासार्ह पुराव्याद्वारे सिद्ध केलेले नाहीत. त्या अनुषंगाने, मी असा निष्कर्ष काढते की वादीची त्याने मागितलेला दिलासा मिळण्यास पात्र नाही. परिणामी, सदर दावा फेटाळण्यास पात्र असून त्यानुसार मी मुद्दा क्र.६ करीता पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा दावा नामंजुर करण्यात येतो.

२. वादीने खर्च सोसावा.

३. येणेप्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.03.17 17:16:39 +0530

दि. १६/०३/२०२६

**( तृष्णा गो. बन्सोड)**
सह दिवाणी न्यायाधिश ( क स्तर ) मानोरा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Smt. R. K. Chavhan (Grade - III) |
| Court Name | :- | (Smt.T. G. Bansod )<br>Jt. Civil Judge (Jr. Dn.) and J.M.F.C.,<br>Manora. Dist. Washim. |
| Date | :- | 16/03/2026 |
| Judgment signed by the presiding officer on | :- | 16/03/2026 |
| Judgment uploaded on | :- | 17/03/2026 |